# महागरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिांक ०५-१२-२००९

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**५/१२/२००९ रोजी संपन्न झालेल्या {दि.४/१२/२००९ रोजीची तहकुब सभा}**
**स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१८) इतिवृत्त**

दि.४/१२/२००९ रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा, शनिवार, दिनांक ५ डिसेंबर २००९ रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.०० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त श्री. पुरूषोत्तम भापकर, भा.प्र.से., नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
०३. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०४. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०५. श्री. सुरे सिताराम इसराम
०६. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०७. श्री. कुचे नारायण तिलोकचंद
०८. श्री. जावेद हसन खान
०९. श्री. पांडे विनायक प्रभाकर
१०. श्री. कैसर खान बद्रोद्यीन खान
११. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१२. सौ. मोमीन सफिया फिरदौस
१३. श्री. शिंदे दामोधर माधवराव

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : सर्व सदस्यांची मागणी आहे की, समांतर जलवाहिनीचे काम लवकर चालु करण्यात यावे जिल्हयाचे खासदार मा.श्री.खैरे साहेब तसेच इतर मा.आमदारांनी,नेत्यांनी प्रयत्न करून केंद्र शासनाकडुन निधी आणलेला आहे. केंद्र शासनाकडील निधी बँकेत ठेवलातर व्याज किती मिळणार आहे याचा खुलासा प्रशासनाने करावा.

श्री.प्रशांत देसरडा : कालची चर्चा विषय क्र.223 वर चालू आहे. 6 महिने मुदतठेव ठेवणार म्हणजे 6 महिने प्रयत्न करणार नाही का. केंद्र शासनाचा निधी आलेला आहे आणि तो निधी सहा महिण्यांसाठी डिपॉझिट ठेवणार आहे जो कालावधी नमुद केला त्यामुळे स.सदस्यांच्या मनात शंका आली. समांतर जलवाहिनीचे

कामात किती अग्रेसर आहे आणि दुसऱ्यावर किती डिपेंड रहावे लागते यात कुठेतरी समन्वयाची तफावत दिसली ती तफावत न राहता काम लवकरात लवकर कसे होइ्ल तसेच स.सदस्यांनी सुचविल्यानुसार 26 जानेवारीला कोणत्याही परिस्थितीत समांतर जलवाहिनीच्या कामाचे उद्घाटन करायचे आहे व काम चालु करायचे आहे. प्रशासनाने जो खुलासा केला त्यात समाधान झाले नाही त्यामुळे सभा तहकूब केली. सर्व अधिकाऱ्यांनी एकत्र मिळुन काम केल्यास नक्कीच 26 जानेवारी रोजी काम सुरू होईल. या कामामध्ये पत्रकारांनी योग्य साथ मिळेल. एकसंघ एकमताने काम केले तर आत्मविश्वास निर्माण होईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सर्व जनतेच्या भावना लक्षात घेऊन लवकरात लवकर काम मार्गी लागावे. याकामाचे श्रेय आमच्या कमिटीला मिळावे असा उद्देश आहे. नियोजनबध्द काम केल्यास हे काम नक्कीच होईल. बँकेत पैसे ठेवणे हे योग्य आहे व्याजामधून बरीच विकासाचे कामे करता येईल. प्रशासनाने एक टेन्टीटिव्ह प्रोग्राम तयार करावा व त्यास अंतिम करावे. निधी हा राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : बैठक तहकूब करण्याचे कारण हे समांतर जलवाहिनीचे आहे. बऱ्याच वार्डात पाईपलाईन खराब झालेल्या आहेत आमच्या बॉडीच्या कार्यकाळात हे काम झाल्यास आम्हाला समाधान वाटेल. बैठक तहकूब करण्याचे कारण म्हणजे जनतेला शुध्द पाणी मिळावे हा हेतु होता. जी बँक जास्तीत जास्त व्याज देईल त्या बँकेत डिपॉझिट करण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : प्रशासनाकडुन नियोजनबध्द कार्यक्रम हवा आहे. नियोजन काय आहे, निविदा केव्हा उघडणार, अंतिम केव्हा करणार.

शहर अभियंता : समांतर जलवाहिनी योजनेच्या बाबतीत स.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहे स.सदस्यांच्या भावना तळमळीची आहे पाणी मिळावे, मी पुर्णतः सहमत आहे. सविस्तर खुलासा लेखी स्वरूपात आणलेला आहे आणि तो सर्व स.सदस्यांना त्याच्या प्रती देण्यात येईल. श्री.पानझडे, कार्य.अभियंता यांनी कालच्या बैठकीत खुलासा सादर केलेला आहे त्यांचेकडुन ज्या बाबी राहिलेल्या आहेत त्याचा खुलासा करण्यात येत आहे. 269 कोटी रूपये जास्तीचे टाकावे लागणार आहे त्यातील 50 टक्के रक्कम केंद्रशासनाकडुन अपेक्षीत आहे व 50 टक्के सॉफ्ट लोन च्या स्वरूपात घ्यायचा आहे. सुरवातीचा प्रस्ताव हा जायकवाडीपासुन नक्षत्रवाडीपर्यंतचा होता. पीपीपी मॉडल करण्याचे कारण म्हणजे प्रायव्हेट पार्टनर कुणीतरी यावा गुंतवणूक करावी ते पैसे पाणीपट्टीतुन वसुल करावे असा विचार पुढे आल्याने देश पातळीवर अशा अनेक पध्दतीचे प्रोजेक्ट सुरू करण्यात आलेले आहे आणि त्यापध्दतीचे केंद्र शासनाचे धोरण आहे. हे पायलट प्रोजेक्ट राबवित असल्यामुळे 1.2 कोटी अनुदान अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने दिलेले आहे एजन्सी नेमुन दिलेली आहे त्यांनी अभ्यास करून Presentation केलेले आहे. पहिली स्टेज पुर्ण झालेली आहे. स्टेज दोन मधे टेंडर करीत आहे म्हणजे Financial bid सन 2041 पर्यंत पाणी शहराला द्यायचे आहे

त्याबाबतीचे नियोजन आजच करीत आहे. या 30 वर्षासाठी जो कुणी ऑपरेटर असेल त्याला 30 वर्ष हि योजना राबवायची आहे. स्टेप बाय स्टेप सर्व पाईपलाईन बदलायच्या आहेत. व्हॉल्व बदलायचे आहे, equal pressesure द्यायचे आहे. स्लम एरियात मोफत पाणी देणार आहोत साधारणत: 25 टक्के एरियात मोफत पाणी द्यावे लागणार आहे राहिलेल्या मधुन तो वसुल करणार आहे. शहर,नळ किती वाढणार आहे याचा अभ्याससुध्दा करावे लागणार आहे. समांतर जलवाहीनी योजनेचा निविदा कार्यक्रमात अडचणी आहेत. संपुर्ण प्रशासन रात्रंदिवस काम करण्यास तयार आहे. यासाठी वेगळी टिम निर्माण करणार आहोत. वाढीव अनुदान मिळेल याहेतुने  मॉडल तयार करीत आहोत. संपूर्ण डॉक्युमेंट सर्वसाधारण सभा आणि आपल्यासमोर ठेवणार आहोत. Asian Devlopment Bank लोन देणार आहे. एजन्सीने कितीही खर्च केला तरी नागरीकांवर त्याचे आझे येणार आहे. काही जी 50% गळती आहे ती ताबडतोब थांबवुन जास्तीचे पाणी सोडण्यात येईल. 25% गळती कमी होईल. स्टेप बाय स्टेप सर्व कमी होईल. विभागणी निहाय लाईन बदलाव्या लागतील, विभागणी निहाय अभ्यास करावा लागेत आणि यंत्रणा बसवाव्या लागतील. भुसंपादनाची मुख्य अडचण आहे आपल्या ताब्यात आज जागा नाही. भुसंपादन जिल्हाधिकारी करून देणार आहे त्यासाठी 5 कोटी लागणार आहे. नक्षत्रवाडीपर्यंत अडचण नाही कारण तो भाग महानगरपालिकेचा आहे. जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यंत लाईन खाजगी जागेतुन आणावी लागणार आहे. हि अडचण येणार आहे त्याबाबतीतचा सर्व्हे केलेला आहे. पीडब्ल्युडी, सेक्रेटरी यांनाही पत्र दिले आहे. सध्या हया 30 मीटर रोडमधे किंवा रोडच्या सेंटरमधे लाईन देता येते का? आत्ताच्या लाईनच्या बाजुलाच लाईन टाकण्याची परवानगी द्यावी असे पत्र दिलेले आहे. या योजनेच्या अभ्यासक्रमासाठी एक महिणा लागेल असे सांगीतलेले आहे. जो कोणी बीड भरणार आहे त्यास आता 15 दिवस देणार आहे परंतु अस केल्यामुळे प्रशासनाचे आणि क्रिसीलचे मत आहे की, या योजनेचा पुर्ण अभ्यास न करता बीड घेतली तर ते रफ करतील आणि जास्तीचे कोट करतील. स्पर्धात्मक निवीदा होतील कि नाही एक किंवा दोनच निवीदा आल्यातर काय करायच हा ही एक मुद्दा आहे. कमी रेटने साधारण ऑपरेटर आला तर त्यास द्यायचे काय? कायद्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश करायचा हाही एक भाग आहे. पुर्वीचे RFP

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | निविदा प्रसिध्दी | - | दिनांक 20.08.2009 |
| 02 | निविदा विक्री | - | दिनांक 24.09.2009 |
| 03 | निविदापूर्व बैठक | - | दिनांक 08.10.2009 |
| 04 | उपस्थित मुद्दयांचे स्पष्टीकरण | | दिनांक 27.10.2009 |
| 05 | निविदा सादर करण्याची अंतीम तारीख | | 02.12.2009 |
| 06 | निविदा उघडण्याची तारीख | - | दिनांक 02.12.2009 |

07 पात्र निविदाधारकांची यादी प्रसिध्द करणे दिनांक - 15.12.2009

स्टेज-2 मधे मा.महापौर यांचे निवासस्थानी बैठक झाली. त्यात RFP चा कालावधी खालीलप्रमाणे ठरविण्यात आला आहे. हयाच महिण्यात सर्व प्रक्रिया पुर्ण करणार आहे.

01 RFP Document, Financial Model & Concession Agreement ला मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक.

| | | |
|---|---|---|
| 02 | पात्र निविदाधारकांना RFP Document देणे | -दि 15.12.2009 |
| 03 | निविदापूर्व बैठक | -दि.22.12.2009 |
| 04 | उपस्थित मुद्दयांचे स्पष्टीकरण | -दि.28.12.2009 |
| 05 | Financial Bidची निविदा सादर करणे | -दि.31.12.2009 |
| 06 | Financial Bidची निविदा उघडणे | -दि.31.12.2009 |
| 07 | उघडलेल्या निविदांचा तुलनात्मक अभ्यास (Evaluation) करून यशस्वी निविदाधारकांचे नांव जाहिर करणे. | -दि.07.01.2010 |
| 08 | यशस्वी निविदाधारकाची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवणे | -दि.11.01.2010 |
| 09 | Agreement करणे व कार्यादेश देणे | -दि.20.01.2010 |
| 10 | कामांचा उद्घाटन समारंभ | - दि.26.01.2010 |

श्री.प्रशांत देसरडा : तत्कालिन आयुक्तांनी मि.खोत आर्किटेकला भुसंपादनाची कारवाई करण्यासाठी नेमण्यात आले होते. त्यांनी सर्व्हे केला परंतु प्रशासनाचे म्हणने आहे की, 15 दिवसांअगोदर केले. मग खोत आर्किटेकने केले की नाही. ज्या भुसंपादन करायच्या आहेत ती प्रक्रीया अजुन सुरू केली नाही तत्कालिन आयुक्त असतांना प्रोसेस चालु झाली होती ती बंद का पडली. 50 टक्के निधी शासन देणार 50 टक्के निधी मनपाला टाकायचा ते बँकेकडुन घेणार तर मग Private Partner चा अर्थ काय होतो. त्यांनी त्यांचे Contrubution टाकायचे नाही काय? 50 टक्के हिस्सा बँकेने दिला नाही तर मग तो त्याचे Contrubution टाकणार नाही का? भुसंपादनाचे बी ॲण्ड सी चे काय झाले. या सर्वबाबींचा खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : भुसंपादनाचा सर्वे केलेला आहे परंतु मनपाची आर्थीक स्थिती बघता हि जागा मोफत मिळती काय हे सर्वप्रथम पाहिल्या जाणार आहे. जुन्या पाईपलाईनच्या ठिकाणी पाईपलाईन टाकता येते का, मा.आयुक्त,माझे वैयक्तिक संबध साधुन प्रशासकीय स्तरावर अधिकाऱ्यांशी चिफ इंजिनीअरशी समक्ष भेट घेऊन प्रश्न मांडलेला आहे. पाच कोटी रूपयांचे प्रपोजल रेडी आहे जागा मोफत मिळण्याचा प्रयत्न चालु आहे. कलेक्टर ऑफिसकडे पाच कोटी रूपये भरले तर त्यापध्दतीने काम होईल व भविष्यात देखील अडचण येणार नाही. पुढील 30 वर्षी पैठणयेथील रस्ता चौपदरी

होणार आहे. त्यामुळे पाईपलाईन जेवढया दुर घेऊन जाता येईल तेवढी ती गरज आहे. PWD ची जागाही 15 मीटरपैक्षा पुढे नाही. 100 फुट जागा त्यांच्या ताब्यात आहे. उलट त्यांचाच आग्रह आहे की, सदरची पाईपलाईनसुध्दा शिफ्ट करा. मनपाने त्यांना विनंती केलेली आहे की, पाईपलाईन सोडुन भुसंपादन करावे. मनपाचा भुसंपादनाचा येणारा खर्च वाचविण्याचा प्रयत्न आहे. हे शक्य झाले नाहीतर खाजगी लोकांच्या जागेतुनच 5 कोटी देऊन काम करावे लागेल.

श्री.प्रशांत देसरडा : पाईपलाईनसाठी शासनाने काही जीआर काढलेला आहे का की Compulsory Free द्यावी लागते जागा.

मा.सभापती : जागा Free मध्ये घेता येत नाही, परंतु प्रशासन Special Land Acquisitions करणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा : Public Pvt Partnership बाबत माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता : विमानतळ,नॅशनल हायवे यामध हे ऑपरेटर कामे करतात. ऑपरेटरचा पैसा,मनपाचा पैसा,शासनाचा निधी यामधे ppp 134 कोटी टाकणार आहे. नंतर नळांना मिटर व इतर बाबी हे टाकणार आहे. 75 कोटी त्यांचे स्वत:चे राहणार आहे स्टाफ त्यांचा राहणार आहे त्याची व्यवस्था त्यांना करावी लागेल. पाण्याच्या टाक्या,जलशुध्दीकरण हे सर्व स्टेप बाय स्टेप होणार आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक 223 वर बरीच चर्चा झाली आहे. सदस्यांच्या भावनांचा आदर ठेवुन प्रशासनाने याबाबत सविस्तर खुलासा केलेला आहे. म्हणुन समांतर जलवाहिनीबाबत स.सदस्यांच्या ज्या काही शंका होत्या त्या मा.आयुक्तांनी लेखी स्वरूपात सर्व सदस्यांना त्याचा कालबध्द कार्यक्रम लेखी स्वरूपात घोषित केलेला आहे. विषय क्रमांक 223 मा.आयुक्त यांनी सादर केलेला प्रस्ताव मान्य करण्यात येतो व स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्याबाबतचा प्रस्तावास मंजूरी देण्यात येते प्रशासनाने याबाबत वैधानिक कार्यवाही करावी.

**<u>विषय क्र. २२३ :</u>** (*दि.४/१२/२००९ च्या सभेत विषयपत्रिकेवर असलेला २२३ क्रमांकाच्या या विषयावर चर्चा झालेली आहे. सुलभ संदर्भासाठी पुनः हा प्रस्ताव टंकलिखीत करण्यात येत आहे.)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणारे अनुदान एक्सीस बँक मार्फत वितरीत होणार आहे. त्यानुसार समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत रू.१४३.८६ कोटी इतक्या रक्कमेचा निधी एक्सीस बँकेच्या खात्यावर जमा झालेला आहे. सदरील निधीचा सहा महिने इतक्या कालावधीसाठी आवश्यकता नसल्याचे व सदरील रक्कम सहा महिन्याच्या कालावधीकरीता गुंतवणूक करण्यास हरकत नसल्याचे कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांनी कळविलेले आहे. त्यानुसार खालील बँकाचे सहा महिने व एक वर्ष या कालावधीसाठी गुंतवणूकी करीता व्याजाचे दर मागविण्यात आले, ते खालील प्रमाणे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | कालावधी | व्याज दर |
|---|---|---|---|
| १. | ॲक्सीस बँक लि. | ६ महिने<br>१२ महिने | ४.५०%<br>६.००% |
| २. | आय.डी.बी.आय.बँक | ६ महिने | ५.७५% |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १२ महिने | ६.५०% |
| ३. | युनायटेड बँक ऑफ इंडिया | ६ महिने<br>१२ महिने | ५.७५%<br>६.२५% |
| ४. | स्टेट बँक ऑफ इंडिया | ६ महिने<br>१२ महिने | ५.२५%<br>६.००% |
| ५. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद | ६ महिने<br>१२ महिने | ६.००%<br>७.००% |
| ६. | महाराष्ट्र ग्रामीण बँक | ६ महिने<br>१२ महिने | ६.५०%<br>७.५०% |
| ७. | बँक ऑफ महाराष्ट्र | ६ महिने<br>१२ महिने | ४.५०%<br>५.५०% |

तुलनात्मकदृष्ट्या व्याज दराचे विचार केल्यास महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्याज दर सर्वात जास्त आहेत. तथापी सदरील बँक अनुसूचित असून एवढ्या मोठ्या प्रमाणावरील रक्कम शेड्यूल्ड बँकेत ठेवणे जोखमीचे राहिल. केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी शक्यतो राष्ट्रीयीकृत बँकेतच ठेवणे बाबत मार्गदर्शक सुचना आहेत. करिता स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ही राष्ट्रीयीकृत व कोषागाराची बँक असल्यामुळे समांतर जलवाहिनीसाठी प्राप्त झालेला उक्त रू.१,४३,८६,८०,०००/- इतकी रक्कम सहा महिने ते एक वर्ष कालावधीसाठी टर्म डिपॉजिट रिसिप्ट या स्वरूपात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाकडून समांतर जलवाहिनी योजने अंतर्गत प्राप्त झालेली निधीची रक्कम गुंतवणुकीकरीता बँकांकडून प्राप्त झालेल्या व्याजाचे दराचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता समांतर जलवाहिनीसाठी प्राप्त झालेला निधी रक्कम रू.१,४३,८६,८०,०००/- इतकी रक्कम सहा महिने ते एक वर्ष कालावधीसाठी टर्म डिपॉजिट रिसिप्ट या स्वरूपात स्टेट बँक ऑफ हैद्राबाद या राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा. सभापती : ऐनवेळचे सर्व विषयांना मंजुरी देण्यात येते.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-८ बजरंग चौक ते ओंकार गॅस पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहिनी टाकणेचे प्रस्तावित आहे. या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागाच्या सन २०००६-०७ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.८,२६,१५०/- चे तयार करण्यात आले होते. अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मान्यता झाल्यानंतर ई-टेंडरींग विभागामार्फत निविदा मागविण्यात आली होती. प्राप्त निविदामध्ये २ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये कमी दराची निविदा मे.दिप इंटरप्रायजेस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.९१% जास्त दराने होती. संबंधीत गुत्तेदाराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे निविदेस मान्यता झाल्यानुसार त्यांचेकडून करारनामा करून घेऊन त्यांना कार्यादेश देण्यात आला होता. गुत्तेदार मे.दिप इंटरप्रायजेस यांनी मुदतीत काम न केल्यामुळे त्यांना काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

त्यानंतर या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची दरसुची सन २००८-०९ नुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये १४,८६,५२४/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे.

करीता एन-८ बजरंग चौक ते ओंकार गॅस पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१४,८६,५२४/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-८ बजरंग चौक ते ओंकार गॅस पर्यंत १५० व ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,८६,५२४/- सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. १५ स्वामी विवेकानंदनगर एन-१२ या ठिकाणी ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे या कामाकरीता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण या विभागाच्या सन २००५-०६ च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये ११,९४,५६०/- चे तयार करण्यात आले होते. त्यानुसार निविदा कार्यवाही करून काम करण्यात आलेले आहे. निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.४९% जास्त दराने मान्यता झाल्यानुसार निविदा दरानुसार सदर कामावर खर्च रू.१४,९५,९२२/- असा आहे. परंतु प्रभाग क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर येथे ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे काम करीत असतांना टी.व्ही.सेंटर राजे संभाजी महाराज पुतळ्याखाली जुनी जलवाहिनी असल्याने त्या ठिकाणातून नवीन जलवाहिनी टाकणे शक्य झाले नाही. करीता त्यासाठी जलवाहिनीचा मार्ग बदलून काम करून घेण्यात आले. त्यामुळे व्हॉल्व, जॉइंट, मेकॅनिकल जॉईंट, सी.आय.स्पेशल या साहित्यामध्ये वाढ झालेली असल्याने कामामध्ये रक्कम रूपये २,२२,४०२/- वाढीव खर्च झालेला आहे. वाढीव खर्चाची तरतुद सन २००९-२०१० चे अर्थसंकल्पामध्ये स्पीलच्या कामाच्या यादीमध्ये पृष्ठ क्र.EE-B-३६, अनुक्रमांक ६ वर रूपये २.०० लाखाची तरतुदी ठेवलेली आहे. प्रस्तावित देयकासह कामाचे अंदाजपत्रक रक्कम च्पये १७,१८,३४१/- असे होत आहे.

करीता प्रभाग क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ या ठिकाणी ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्रस्तावित देयकासह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.१७,१८,३४१/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.१५ स्वामी विवेकानंदनगर, एन-१२ या ठिकाणी ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्रस्तावित देयकासह रक्कम रू.१७,१८,३४१/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.१० कब्रस्तानच्या परिसरात असलेली मुख्य ईदगाह मध्ये ओट्या लगतच्या भागात कॉंक्रीटींग करणे व ईदगाह व कब्रस्तान परिसरातील इतर कामे करणेसाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्रमांक ६८२ दिनांक ७/११/२००९ अन्वये रक्कम रू.१४.६५ लक्ष तरतुद वळती करून या कामासाठी उपलब्ध करून देण्याचा ठराव पारित झाला आहे. हे काम करण्यासाठी पत्र जा.क्र.मनपा/अशअ/७६६/२००९, दिनांक २१/११/२००९ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र मागविण्यात आले असता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रमांक मरावमं/एसएनटी-१६०/५९७३/२००९ दिनांक २१/११/२००९ अन्वये ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. सदर ठिकाणी वक्फ बोर्डाची मालकी असून

सार्वजनिक उपयोगासाठी दफन विधी पुर्वीचा विधी करणेसाठी वापरले जात असल्यामुळे त्या ठिकाणी काम करता येईल असे त्या ना हरकत पत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले आहे. त्यानुसार या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रू.१४,६४,८९६/- होत आहे. सदरील काम वरील ठरावाप्रमाणे आणि मान्यतेनुसार स्मशानभुमी विकास या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तुत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर करण्यास मा.आयुक्त महोदय यांची दि.२४/११/२००९ रोजी मान्यता प्राप्त आहे.

तरी वरील प्रमाणे रक्कम रू.१४,६४,८९६/- चे अंदाजपत्रक/प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ.सफिया मोमीन : सदरील काम तातडीने करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये करून घेण्यास मान्यता देण्यात यावी.

मा. सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितल्याप्रमाणे सदरील काम तातडीने करणे अत्यंत आवश्यक असल्याने विषय क्रमांक २२६ चे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये करून घेण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १० कब्रस्तानच्या परिसरात असलेली मुख्य ईदगाह मध्ये ओट्या लगतच्या भागात काँक्रीटींग करणे व ईदगाह व कब्रस्तान परिसरातील इतर कामे करणे या कामासाठी रक्कम रू.१४,६४,८९६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम तातडीने करून घेण्यासाठी मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर काम करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.७६ रामनगर अंतर्गत ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या सन २००८-०९ च्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.३३,१८,०९९/- चे तयार करण्यात येऊन अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७०८ दिनांक ७.११.२००९ नुसार मंजुरी घेण्यात येऊन कामाची रितसर ई-निविदा काढण्यात आली असता ५ निविदा विक्री होऊन स्विकृतीच्या दिवशी एकुण ५ निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.गोसावी एस. के. | अं.प.दरापेक्षा ७.७८६% कमी दराने |
| २. | आरबाज कन्स्ट्रक्शन | ट्रिमिक्स काँक्रेट रस्त्याच्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्याने निविदा अस्विकृत |
| ३. | के.बी.पाथ्रीकर | ट्रिमिक्स काँक्रेट रस्त्याच्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्याने निविदा अस्विकृत |
| ४. | चंद्रम्मा एन.आशन्ना | ट्रिमिक्स काँक्रेट रस्त्याच्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्याने निविदा अस्विकृत |
| ५. | सुमीत कन्स्ट्रक्शन | ट्रिमिक्स काँक्रेट रस्त्याच्या कामाचे अनुभवाचे |

प्रमाणपत्र नसल्याने निविदा अस्विकृत

उपरोक्त अ.क्र.२ ते ५ च्या निविदाधारकांकडे ट्रिमिक्स काँक्रेट रस्त्याच्या कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र नसल्याने निविदा अस्विकृत करण्यात आल्याने सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची निविदा श्री.गोसावी एस.के. यांची प्राप्त झालेली आहे. सदरील निविदा मान्यतेस्तव मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाची श्री.गोसावी एस.के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.७६ रामनगर अंतर्गत ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार श्री.गोसावी एस.के. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२८:**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मान्यतेने उप आयुक्त (सिडको) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.शेख जिलानी शेख कादर, वरीष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या हृदयावर तातडीने (दोन दिवसांच्या आंत) शस्त्रक्रिया करणे असल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहुन मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी विशेष बाब म्हणुन अग्रीम रक्कम रू.३,४०,०००/- मंजुरी केली होती.

संबंधीताने सादर केलेली मुळ देयकाची तपासणी करून रक्कम रू.३,४६,३०१/- वजा ७३५०/- (१०० टक्के प्रमाणे) वजा जाता रक्कम रू.३,३८,९५१/- च्या ९०% प्रमाणे रक्कम रू.३,०५,०५६/- अधिक आय.सी.यु.(१०० टक्के प्रमाणे) रू.६३००/- अधिक जनरल वॉर्ड (९५ टक्के प्रमाणे) रक्कम रू.९९७/- याप्रमाणे (एकुण रक्कम रू.३,०५,०५६+६३००+९९७=३,१२,३५३/-) रक्कम रू.३,१२,३५३/- इतकी रक्कम देय असून एकूण देयकाच्या रक्कम रूपये ३,४६,३०१/- च्या ५ टक्के प्रमाणे रक्कम रू.१७,३१५/- एकूण देयकाच्या रक्कमेतुन वजा जाता रक्कम रू.२,९५,०३०/- इतका खर्च मान्य करून रक्कम रू.४४,९६२/- संबंधीताकडून वसूल करणे बाबतचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अभिप्राय दिला आहे.

श्री.शेख जिलानी शेख कादर, वरिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग यांच्या आजारावर एकूण रक्कम रू.३ख४६,३०१/- इतका खर्च झाल्याचे मुळ देयके कार्यालयात सार करून महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एम.अे.जी./१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३/दिनांक २९ जुलै १९९९ प्रमाणे पाच गंभीर आजारापैकी हृदयरोगावरील शस्त्रक्रिया खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती होवून वरील रक्कमेचे समायोजन करणेसाठी विनंती केली आहे.

करीता श्री.शेख जिलानी शेख कादर, वरिष्ठ लिपीक, मालमत्ता विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या हृदयरोगावर झालेल्या शस्त्रक्रियेच्या खर्चाचे समायोजन करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.शेख जिलानी शेख कादर, वरीष्ठ लिपिक, मालमत्ता विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या हृदयावर तातडीने (दोन दिवसांच्या आंत) शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याने त्यांच्या हृदयरोगावर झालेल्या शस्त्रक्रियेच्या प्रस्तावित खर्चाचे अग्रीम रक्कम रू.३,४०,०००/- ला कार्योत्तर मान्यता देऊन झालेल्या एकुण खर्चाच्या १००% प्रमाणे रक्कम

रू.३,४६,३०१/- च्या खर्चास विशेष बाब म्हणुन मान्यता देऊन समायोजन करण्यास (वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२२९:**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पहाडसिंगपुरा येथील मुस्लीम धोबी कब्रस्तान विकसीत करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.विभाग दरसुची सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आले असुन अं.प.रक्कम रू.१९,९९,५४५/- आहे. सदर काम अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक अविवि-२००९/प्र.क्र.४३/०९/का-१, दिनांक १२/६/२००९ अन्वये राज्यातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात मुलभूत नागरी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्याकरीता प्राप्त शासकीय अनुदान रक्कम रू.२०.०० लक्ष मधुन प्रस्तावित आहे. मा.स्थायी समिती सभा विषय क्र.८२ दि.१८/८/२००९ अन्वये अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामाच्या निविदा जा.क्र.मनपा/अशअ/२४०/२००९, दिनांक १/८/२००९ पत्राद्वारे ई-टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या असता ई-टेंडरींग विभागाने दिलेल्या अहवालानुसार एकुण दहा (१०) निविदा विक्री झाल्या व स्वीकृतीच्या अंतिम तारखेस दिनांक २९.८.२००९ रोजी एकुण ०९ निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.काझी नुर मोहीउद्यीन | २०.९९% कमी |
| २. | मे.मोना कन्स्ट्रक्शन | १९.९९% कमी |
| ३. | श्री.सिद्यीकी जलीसउद्यीन | १८.५% कमी |
| ४. | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | १६.८६% कमी |
| ५. | मे.हायवे कन्स्ट्रक्शन | १६.३% कमी |
| ६. | मे.इरम कन्स्ट्रक्शन कंपनी | १२.८% कमी |
| ७. | श्री. एस.ए.देशमुख | १२.१३% कमी |
| ८. | मे.तुषार कन्स्ट्रक्शन | ११.०६% कमी |
| ९. | श्री.शेख सलीम मोहीउद्यीन | ८.८९% कमी |

वरील प्रमाणे अंदाजपत्रका पेक्षा २०.९९% कमी आणि तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.काझी नुर मोहीउद्यीन यांची आहे. त्यास दिनांक ७.११.२००९ रोजी मा.आयुक्त महोदय यांची मंजुरी झाली आहे. श्री.काझी नुर मोहीउद्यीन यांची २०.९९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपुरा येथील मुस्लीम धोबी कब्रस्तान विकसीत करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९९% कमी दराची श्री.काझी नुर मोहीउद्यीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३०:**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड-ई व फ यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी अंतर्गत समतानगर ते दंत महाविद्यालय पर्यंत १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणे आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १७,९८,६६०/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय

मान्यता झाली. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठा भांडवली कामे या लेखाशिर्षा मधुन करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रूपये १७,९८,६६०/- चे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९८ नक्षत्रवाडी अंतर्गत समतानगर ते दंत महाविद्यालय पर्यंत १०० व १५० मी.मी. व्यासाची डी.आय.के.-७ जलवाहिनी टाकणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१७,९८,६६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३१:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. १२ अंतर्गत विविध ठिकाणच्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर रस्त्यांची तातडीने काँक्रेटींग करणे आवश्यक आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात ५.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.नगरसेवक यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.१२ अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रेटींग करणे - ५.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १२ अंतर्गत विविध ठिकाणच्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर रस्त्यांची तातडीने काँक्रेटींग करणे या कामासाठी उपलब्ध तरतुद तसेच नागरीकांचे व स.नगरसेवक यांचे मागणीनुसा खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.१२ अंतर्गत विविध ठिकाणी काँक्रेटींग करणे - ५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ६० सिल्लेखाना अंतर्गत विविध ठिकाणच्या डांबरी रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असून सदर रस्त्यांची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.नगरसेविका यांची काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.६० येथे विविध ठिकाणी मुख्य रस्त्याचे डांबरीकरण/दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

२. सिल्लेखाना प्रभागांतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण/दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : दामोधर शिंदे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ६० सिल्लेखाना अंतर्गत विविध ठिकाणच्या डांबरी रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली असून या भागातील नागरीकांचे तक्रारी असुन स.नगरसेविका यांची काम लवकर करण्याची मागणी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.६० येथे विविध ठिकाणी मुख्य रस्त्याचे डांबरीकरण/दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

२. सिल्लेखाना प्रभागांतर्गत विविध मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण/दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२३३:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ५९ खोकडपुरा येथील मारोती मंदीरालगत गटार दुरूस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. सदर मंदीराचे ठिकाणी हरिनाम सप्ताह, दैनंदिन भजन, किर्तनाचे कार्यक्रमासाठी भाविक येत असतात. तुटलेल्या गटारीमुळे घाण पाणी मंदीराच्या आवारात पसरल्याने दुर्गंधी सुटलेली आहे. यामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच नागरीकांचे तक्रारी असुन हे काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.५९ खोकडपुरा येथील मारोती मंदीरालगत गटार दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे — अनुमोदक : दामोधर शिंदे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५९ खोकडपुरा येथील मारोती मंदीरालगत तुटलेल्या गटारीमुळे घाण पाणी मंदीराच्या आवारात पसरल्याने दुर्गंधी सुटलेली आहे. यामुळे भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे तसेच नागरीकांचे तक्रारी व काम तातडीने करून घेण्याबाबतची मागणी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.५९ खोकडपुरा येथील मारोती मंदीरालगत गटार दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२३४:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील जलतरण तलावाकडून आलेली ओव्हरहेड वायर सर्पालय, निलगाय, सांबराच्या पिंजऱ्यासमोर ओव्हरहेड वायर तार तुटून पडल्याने अपघात होतात. त्यामुळे ओव्हरहेड वायर काढून त्याजागी केबल टाकण्याची मागणी मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी दि.२७/७/०९ च्या पत्रानुसार शहर अभियंता यांचेकडे केली. मा.न्यायमुर्ती चपळगांवकर यांच्या अध्यक्षतेखालील प्राणी संग्रहालय सुधार समितीने प्राणी संग्रहालयातील सर्व केबल भुमीगत असावेत अशी शिफारस केलेली आहे. त्याअनुषंगाने सदरील काम तातडीने हाती घेण्याबाबत उप आयुक्त (म.) यांनी अभिप्राय दिलेला आहे. यापैकी जवळपास अर्ध्यापेक्षा जास्त काम

झालेले असुन उर्वरीत काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात प्राणी संग्रहालय विकास कामे या शिर्षकाखाली आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. उद्यानात तसेच प्राणी संग्रहालयात येणारे लहान मुले व नागरीकांना देखील धोका होऊ शकतो. या सर्व बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेली काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. प्राणी संग्रहालयातील संपुर्ण ओव्हरहेड वायर काढुन भुमीगत करणे - ५.६० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दत्ताभाऊ पाथ्रीकर, भगवान घडमोडे अनुमोदक : प्रशांत देसरडा, रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालयातील जलतरण तलावाकडून आलेली ओव्हरहेड वायर सर्पालय, निलगाय, सांबराच्या पिंजऱ्यासमोर ओव्हरहेड वायर तार तुटून पडल्याने अपघात होत असल्याने ओव्हरहेड वायर काढून त्याजागी केबल टाकण्याची मागणी मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांचे मागणी व मा.न्यायमुर्ती चपळगांवकर यांच्या अध्यक्षतेखालील प्राणी संग्रहालय सुधार समितीने प्राणी संग्रहालयातील सर्व केबल भुमीगत असावेत अशी शिफारस केलेली असल्यामुळे या सर्व बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. प्राणी संग्रहालयातील संपुर्ण ओव्हरहेड वायर काढुन भुमीगत करणे - ५.६० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ४८ अंतर्गत अविष्कार कॉ. एन-६, म्हाडा वसाहतीतील अंतर्गत गल्ल्यात व अरूंद रस्त्याचे पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम करावयाचे असून ररस्त्यांचे कॉंक्रीट जागोजागी फुटलेले असून खड्डेच खड्डे झालेले आहेत. नागरीकांची सतत मागणी असून सदरील काम तातडीने करून घेणे गरजेचे आहे. या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात रू.१०.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असून काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी एन-६ येथील अंतर्गत गल्ल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे - ९.९८लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर अनुमोदक : दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ४८ अंतर्गत अविष्कार कॉ. एन-६, म्हाडा वसाहतीतील अंतर्गत गल्ल्यात व अरूंद रस्त्याचे पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम तातडीने करून घेणे आवश्यक असल्याने अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.४८ अविष्कार कॉलनी एन-६ येथील अंतर्गत गल्ल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे - ९.९८लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३६:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. १० मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल लावणे व इतर विद्युत विषयक कामांची पाहणी करून खांबाचे आर्थिक बॉक्स बसवणे, बेगमपुरा, जयसिंगपुरा चौकातील हायमास्टचे फिटींग बसविणे इ. कामाचा व सुरक्षा विषयक कामाचा समावेश असून या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात ४.०० लक्षची आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील विद्युतविषयक कामे तातडीने करून घेण्याकरीता रू.४.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार असून सदरचे काम तातडीने करून घेणे गरजेचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.१० मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल लावणे व विद्युत सुरक्षा विषयक कामे करणे - ४.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १० मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल लावणे व इतर विद्युत विषयक कामांची पाहणी करून खांबाचे आर्थिक बॉक्स बसवणे, बेगमपुरा, जयसिंगपुरा चौकातील हायमास्टचे फिटींग बसविणे इ. सुरक्षा विषयक कामे तातडीने करून घेण्याकरीता रू.४.०० लक्षचे अंदाजपत्रकानुसार मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.१० मध्ये विविध ठिकाणी जीआय पोल लावणे व विद्युत सुरक्षा विषयक कामे करणे - ४.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३७:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.११ भडकलगेट अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे आवश्यक असून या कामासाठी सर्वसाधारण सभेने ७.०० लक्षची तरतुद उपलब्ध करून दिलेली आहे. सदर काम नागरीकांच्या व आरोग्याच्या दृष्टीने त्वरीत सुरू करणे आवश्यक आहे. तरी सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.११ भडकलगेट अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सर्वसाधारण सभेने उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने रू.७.०० लक्षचे काम तातडीने करून घेण्यास्तव सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३८:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.हुसेन जमादार, सचिव, स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळ, औरंगाबाद यांनी अर्जाद्वारे विनंती केलेली आहे की, मो.गारखेडा परिसर, न.भु.क्र.१५३०२/१२ येथील नुपुर अपार्टमेंट जवळील महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक सभागृह स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळास दि.६.१२.२००७ रोजी पाच वर्षाच्या भाडेतत्वावर करारनामा करून दिलेला आहे. तरी त्यांना सामाजिक उपक्रम दीर्घकाळ राबविण्याकरीता दीर्घ मुदतीच्या (३० वर्षे) भाडेतत्वावर देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : प्रल्हाद निमगांवकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.हुसेन जमादार, सचिव, स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळ, औरंगाबाद यांनी अर्जाद्वारे विनंती केल्याप्रमाणे मो.गारखेडा परिसर, न.भु.क्र.१५३०२/१२ येथील नुपुर अपार्टमेंट जवळील महानगरपालिकेच्या मालकीचे सांस्कृतिक सभागृह स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा व क्रिडा मंडळास पाच वर्षाच्या भाडेतत्वावर करारनामा करून दिल्याप्रमाणे त्यांना सामाजिक उपक्रम दीर्घकाळ राबविण्याकरीता दीर्घ मुदतीच्या (३० वर्षे) भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२३९:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, न.भु.क्र.17804 जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्व्हल इमारतमध्ये पहिल्या मजल्यावर मनपाच्या मालकीचे अंदाजे 1000 चौ.फुट जागा ज्याचा घर क्रमांक 4/4/17 असुन महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यापासुन सदरील जागा रिकामी आहे. सदरची जागा मनपाच्या ताब्यात आल्यापासून रिक्त असून विनावापर पडून आहे. ही जागा भाड्याने देणे संदर्भात बऱ्याच वेळेस मालमत्ता विभागाकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही. ही जागा पडून असल्साने तेथे घाण झालेली असून मोडकळीस आलेली आहे. सध्या मनपास या जागेपासून एकही रूपया उत्पन्न मिळत नाही.

श्री वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट, रजि.नं.एफ-6048(औ)/2000 ही सेवाभावी नोंदणीकृत संस्था असून त्यांच्या माध्यमातून एक अभिनव उपक्रमाचा भाग म्हणुन गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिकवणी वर्ग व अभ्यासिका तसेच स्पर्धात्मक परिक्षा वर्गांची विशेष तयारी करून घेतली जाते. हा उपक्रम संस्थेमार्फत माफक फिस मध्ये गेल्या सात वर्षापासून चालविण्यात येत आहे. संस्थेने सदरची जागा भाडेतत्वावर मिळण्याची विनंती केली असून सदर जागा संस्थेस भाड्याने दिल्यास संस्थेच्या माध्यमातुन माफक फिस मध्ये गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पुर्ण होतील व महानगरपालिकेच्या महसुल उत्पन्नात वाढ होईल.

करीता मनपाच्या प्रचलित अटी-शर्तीनुसार सदरची जागा श्री वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेस शैक्षणिक उपक्रमासाठी भाडेतत्वावर देण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे    अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न.भु.क्र.17804 जयहिंद कॉलनी येथील सिटी मार्व्हल इमारतमध्ये पहिल्या मजल्यावर मनपाच्या मालकीचे अंदाजे 1000 चौ.फुट जागा मनपाच्या ताब्यात आल्यापासून रिक्त व विनावापर पडून असलेली जागा भाड्याने देणेसाठी निविदा मागवूनही प्रतिसाद मिळात नसल्याने या जागेपासून आजपर्यंत मनपास एकही रूपया उत्पन्न मिळालेले नाही. मनपाच्या महसुली उत्पन्नात भर पडावी म्हणुन श्री वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट या सेवाभावी वृत्तीने शैक्षणीक उपक्रम चालविणाऱ्या नोंदणीकृत संस्थेने मागणी केल्याप्रमाणे मनपाच्या प्रचलित अटी-शर्तीनुसार सदरची जागा श्री वरखेडेश्वरी चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेस शैक्षणिक उपक्रमासाठी दीर्घ मुदतीवर भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४०:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मोईन-उल-उलुम ही शाळा सुमारे ५० वर्ष जुनी शाळा असुन या शाळेमध्ये सकाळ व दुपारच्या दोन्ही सत्रात सुमो ४००० विद्यार्थी शिक्षण घेत असुन शाळेच्या पश्चिम भागातील १२ मी. डी.पी. रोड अत्यंत खराब झालेला असुन त्यामध्ये मोठे खड्डे पडले असुन खडीकरण खराब झालेले आहे. विद्यार्थ्यांना येण्याजाण्यास व वाहनांना वाहतुकीस फार त्रास होत आहे. शाळकरी विद्यार्थ्यांचे किरकोळ अपघाताचे प्रमाण वाढलेले असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे या रोडचे मजबुतीकरण व खडीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र.९६ मधील मोईन-उल-उलुम पश्चिम भागातील १२ मीटर डी.पी.रोडचे खडीकरण, मजबुतीकरण करणे हे काम अत्यंत आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस    अनुमोदक : खान मेहरून्नीसा खान, सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ मधील मोईन-उल-उलुम शाळेच्या पश्चिम भागातील १२ मी. डी.पी. रोड अत्यंत खराब झालेला असल्याने या डी.पी.रोडचे खडीकरण, मजबुतीकरण करणे हे काम अत्यंत आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४१:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९६ मधील मनपा आरोग्य केंद्र तथा मंगल कार्यालयाच्या शेजारील परिसरात अत्यंत घाण, कचरा साचलेला असतो. सदरील ठिकाणी ओपन स्पेस असून त्यास लागून लहान-लहान गल्ल्या आहेत. या परिसरात व ओपन स्पेसमध्ये रहिवासी कचरा व घाण फेकत असल्याने या ठिकाणी कुत्रे, डुकरे फिरत असतात. सदर ठिकाणी मनपा आरोग्य केंद्रामध्ये प्रसुतीगृह असून लहान मुलांच्या जिविताला धोका या मोकाट कुत्रे व डुकरांमुळे होऊ शकतो. करीता या परिसरात काँक्रेटींग करणे अत्यंत आवश्यक आहे.

करीता वॉर्ड क्र.९६ मधील मनपा आरोग्य केंद्र तथा मंगल कार्यालयाच्या शेजारील परिसरात काँक्रेटींग करणे अत्यंत आवश्यक असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : खान मेहरून्नीसा खान, सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ मधील मनपा आरोग्य केंद्र तथा मंगल कार्यालयाच्या शेजारील परिसरात अत्यंत घाण, कचरा साचलेला असतो आरोग्य केंद्रामध्ये प्रसुतीगृह असून लहान मुलांच्या जिविताला धोका या मोकाट कुत्रे व डुकरांमुळे होऊ शकतो म्हणुन या परिसरात काँक्रेटींग करणे आवश्यक असल्याने मनपा आरोग्य केंद्र तथा मंगल कार्यालयाच्या शेजारील परिसरात काँक्रेटींग करणेचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत त्यासाठी लागणाऱ्या खर्चासह अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३९ अंतर्गत खाराकुआ येथील खुली जागा विकसीत करणे आवश्यक असून त्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. तसेच नाईकवाडा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणे गरजेचे आहे. सदरील कामे तातडीने करून घेण्यासाठी खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.३९ खाराकुआ येथील खुली जागा विकसीत करणे - २.५० लक्ष
२. वॉर्ड क्र.३९ अंतर्गत नाईकवाडा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

सुचक : विनायक पांडे अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३९ अंतर्गत खाराकुआ येथील खुली जागा विकसीत करणे व नाईकवाडा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणेची खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा

अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.३९ खाराकुआ येथील खुली जागा विकसीत करणे - २.५० लक्ष

२. वॉर्ड क्र.३९ अंतर्गत नाईकवाडा येथील सुलभ शौचालय दुरूस्ती करणे - २.५० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४३:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत विविध ठिकाणच्या पथदिव्यांचे केबल उघड्या आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पथदिव्यांचे केबलची तातडीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सिडकोच्या नवीन भागात विद्युत पोल नसल्याने अंधरामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. तरी या भागात आवश्यकते नुसार पोल लावणे गरजेचे आहे. सदरील कामे तातडीने करून घेणे गरजेचे असून या कामासाठी सन २००९-१० च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. या भागातील नागरीकांचे तक्रारी असून काम लवकर करण्याची मागणी आहे. वरील बाबी लक्षात घेता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार खालील दर्शविलेले काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.७३ मधील थ्री-सेट लाईट व केबल दुरूस्तीचे काम करणे - ४.०० लक्ष

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : दामोधर शिंदे अनुमोदक : भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ७३ अंतर्गत विविध ठिकाणच्या पथदिव्यांचे केबल उघड्या आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता लक्षात घेता पथदिव्यांचे केबलची तातडीने दुरूस्ती करणे व आवश्यकते नुसार पोल लावणे ही कामे तातडीने करून घेणे गरजेचे असल्याने अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार वॉर्ड क्र.७३ मधील थ्री-सेट लाईट व केबल दुरूस्तीचे काम करणे - ४.०० लक्षचे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलब्ध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ०१ हर्सुल अंतर्गत फुलेनगर स्लम मधील ड्रेनेज लाईन जुनी असून या ठिकाणी असलेली ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन मैलायुक्त पाणी रस्त्यावरून वाहते ज्यामुळे दुर्गंधी पसरत असुन नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. प्रभागातील रहिवाश्यांच्या देखील अनेक तक्रारी प्राप्त होत असतात. नागरीकांचे आरोग्याचा विचार करता सदरचे काम तातडीने जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेचे काम करणे अत्यंत आवश्यक असुन अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार रू.४,९९,७४७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. तरी सदर काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदार एम.डी.पटेल यांचेमार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : नारायण तिलोकचंद कुचे अनुमोदक : भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ०१ हर्सुल अंतर्गत फुलेनगर स्लम मधील जुनी ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन मैलायुक्त पाणी रस्त्यावरून वाहते त्यामुळे नागरीकांचे आरोग्याचा विचार करता जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेचे काम अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतुदीनुसार रू.४,९९,७४७/- चे काम मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदार एम.डी.पटेल यांचेमार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४५:**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-६ स्मशानभुमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोषनगेट पर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये २६,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.८.२००९ विषय क्र.५५५ अन्वये मान्यता मिळालेली असून, त्यानुसार कामासाठी ई-निविदा विभागातर्फे निविदा कार्यवाही केली असता दोन निविदा प्राप्त झाल्या आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. मे. नुर कन्स्ट्रक्शन | १९.९९% जास्त दराने |
| २. व्ही. एस. देशमुख | २३.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% जास्त दराची निविदा मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली आहे. दराबाबतच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.९९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.५०% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार सर्वात कमी दराची मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त निविदा मंजुरीस्तव मा.स्थायी समिती समोर सादर करण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. तरी मे.नुर कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ९.५०% जास्त दराची निविदा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-६ स्मशानभुमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोषनगेट पर्यंत ३०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे. नुर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा ९.५०% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४६:**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र पोच रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रू.१०,८५,९५०/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर या लेखा शिर्षकामधुन करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केलली आहे व मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत केले आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रू.१०,८५,९५०/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र पोच रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१०,८५,९५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ३४ खडकेश्वर अंतर्गत नारळीबाग येथे गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणेचे काम करणे आवश्यक असून त्यासाठी रू.५.०० लक्षची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. व खडकेश्वर भागातील विविध रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेचे कामासाठी ५.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील कामे तातडीने करून घेण्यासाठी खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्याचे मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.३४ मधील नारळीबाग (दक्षिण भाग) येथील गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे
   व पेव्हर ब्लॉक बसविणे. - ५.०० लक्ष

२. वॉर्ड क्र.३४ मधील खडकेश्वर भागातील विविध रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे - ५.०० लक्ष

सुचक : मोमीन सफिया फिरदौस अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ३४ खडकेश्वर अंतर्गत नारळीबाग येथे गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे व खडकेश्वर भागातील विविध रस्त्याचे कॉंक्रेटींग करणेचे काम उपलब्ध तरतुदीच्या अधीन राहून खालील दर्शविलेली कामे मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ चे नियम २ (२) अन्वये उपलबध ठेकेदारा मार्फत अं.प.दरावर तातडीने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

१. वॉर्ड क्र.३४ मधील नारळीबाग (दक्षिण भाग) येथील गल्ल्यात कॉंक्रेटींग करणे
   व पेव्हर ब्लॉक बसविणे. - ५.०० लक्ष

२. वॉर्ड क्र.३४ मधील खडकेश्वर भागातील विविध रस्त्याचे कॉंक्रेटींग करणे - ५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : गेल्या काही दिवसांपासून स्थायी समितीने काही कामे 5 (2)2 मध्ये मंजूर करून मा.आयुक्तांकडे पाठविलेली आहे. स्थायी समितीचा कार्यकाळ सुरू झाल्यानंतर लोकसभा, विधानसभा निवडणुकींची आचारसंहितेमधे बराच काळ गेला तसेच येणारी मनपा निवडणुकीची आचारसंहिता यामध्ये जाणारा वेळ स.सदस्यांची काम करून घेण्याची निकडीची, नागरीकांची गरज लक्षात घेउन काही कामे 5 (2)2 मध्ये मंजूर केलेली आहे.

मा.सभापती : 5 (2)2 ची कामे मा.महापौर,तत्कालिन महापौर विरोधी पक्ष नेता तसेच इतर स.सदस्यांची कामे आहेत.

श्री.सतिष कटकटे : बजेटबुक उशीराने मिळालेले आहे. इस्टीमेट होण्यासाठी उशीर लागतो व त्यानंतरची प्रोसेससाठी दोन महिणे कालावधी लागतो त्यासाठी 5 (2)2 मधील प्रस्ताव मंजूर करण्यात यावे.

श्री.विनायक पांडे : 5 (2)2 चे प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केल्यावर कोणते कामे तातडीने करावेत याचे अधिकार प्रशासनाचे आहेत.

मा.सभापती : 5 (2)2 चे प्रस्ताव मंजूर करतांना स्पष्ट लिहिले जाते की, प्रशासनाने नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी.

श्री.प्रशांत देसरडा : एखादया नगरसेवकाचे 5 (2)2 मधे कामे झाल्यास दुसऱ्याही सदस्याला वाटते की, 5 (2)2 मधे काम व्हावे. प्रस्ताव मंजूर केल्यानंतरही प्रशासनाने त्याची तातडी पाहून तपासुन पहावी. प्रशासनाने एखादा प्रस्ताव नामंजूर जरी केला तरी त्याबाबत काहीही आक्षेप राहणार नाही. प्रशासनो योग्य भुमिका घेउन योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : 5 (2)2 चा अर्थ आजपर्यंत कळालेला नाही ज्या वार्डामधे कामे झालेली नसेल त्या कामाची तातडी असेलतर मंजूर करावे. 5 (2)2 ची सर्व कामांची छाननी करून कोणते कामे तातडीने आहे याचा निर्णय घ्यावा व सर्व कामांना मंजूरी द्यावी.

श्री.रविकांत गवळी : एका वर्षात साधारणतः सात महिणे आचारसंहितेमधे गेलेले आहे. पाच महिण्यात विकास कामे करायची असल्यामुळे 5 (2)2 चे कामे हि सर्व पक्षांच्या नगरसेवकाचे होत आहे. सर्व सदस्यांना वाटते की, काम लवकर झाले पाहिजे हा उद्देश असतो. बजेटमधे तरतुद असते अंदाजपत्रक तयार केलेले असते फक्त प्रशासकीय मान्यता त्यानंतर मा.सभापती यांनी दिलेल्या रूलिंग प्रमाणे कामे करावीत. पत्रकारांना 5 (2)2 बाबत चुकीचा गैरसमज झालेला आहे. फक्त शहरातील विकास कामे होणे गरजेचे असल्यामुळे 5 (2)2 नुसार कामे केली जातात. मा.आयुक्तांना विनंती आहे की, 5 (2)2ची जी काही तातडीचे कामे असतात ती सुरू करण्यात यावी.

मा.सभापती : इस्टीमेट रेटने 5 (2)2 करता येणार नाही,त्यात महानगरपालिकेचा लॉस आहे. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्या रेटने कामे सुरू आहे त्याच रेटने कामे करता येतील.

मुख्यलेखाधिकारी : 5 (2)2 मधे इस्टीमेट सादर होतात अंदाजपत्रीकीय रेटने येतात. सध्या जो टेंडरचा रेट सुरू आहे टेंडरनुसार जे इस्टीमेट येतात त्याच्यामधे 35 टक्के बिलो स्पर्धेत गेलेले आहे. त्याचा फायदा महानगरपालिकेला होतो . इस्टीमेट रेट आणि टेंडर यामधे तुलना केली तर 15 ते 20 टक्केंचा फरक पडतो. याबाबीचा विचार होऊन निर्णय होणे योग्य वाटते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : सदरच्या कामे झाली हे कुणी पाहिलेले आहे का? जे इस्टीमेट आलेले आहे त्याच्या 15 ते 20 टक्के कमी करून मान्य करा.

श्री.रविकांत गवळी : स्पर्धेत महानगरपालिकेमधे बिलोमधे कामे जातात. दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार केले जाते. बाजारभावामधे कमीजास्त तफावत असते. जर अंदाजपत्रक बनवतांना योग्य तो भाव आहे त्याप्रमाणे बनविला जातो. बीलोमधे काम घतोतर त्याची गुणवत्ता पाहिली जाते का?

श्री.प्रशांत देसरडा : प्रशासनाची जबाबदारी आहे मुख्यलेखाधिकारी यांनी त्यांचा खुलासा केलेला आहे. प्रशासनाची जबाबदारी आहे प्रशासन योग्य ते निर्णय घेतील.

मा.सभापती : स्थायी समिती सदस्यांनी किंवा इतर सदस्यांनी प्रस्ताव ठेवलातर मान्य करेल परंतु रेट कमी जास्त करण्याचा अधिकार प्रशासनाचा आहे. याबाबीचा सर्व अधिकार मा.आयुक्तांना देण्यात येत आहे. प्रचलित दर याबाबीचा सविस्तर अभ्यास करून सर्व कार्यकारी अभियंता,मुख्यलेखाधिकारी यांचेशी चर्चा करून

योग्य तो निर्णय घेण्यात यावा. सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : महानगरपालिका मुख्यालयाच्या परिसरात आयडीबीआय बँक आहे गेल्या 15 वर्षांपासून सदर बँकेचे लाईटबील कोण भरतो. खाजगी व्यक्तिने सार्वजनिक कामासाठी लाईट पोलवरून फोकस लावला तर त्यांच्यावर गुन्हा दाखल होतो. प्रशासनाने आजपर्यंत बँकेच्या लाईट बीलाबाबत कुढली कारवाई केली आहे. मागील बैठकांमधे प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी म्हणुन रुलींग देण्यात आली होती. अतिक्रमणासाठी पोलीस यंत्रणा कार्यन्वित करण्यासाठी मा.आयुक्तांनी बोलाविल्याशिवाय येत नाही. पाण्याचे एक कोटी रूपये पोलीसांकडे बाकी असेल. दररोजचे 30 ते 40 टँकर पाण्याचे नेण्यात येतात. अतिक्रमानासाठी पोलीस यंत्रणा हवी असल्यास मा.आयुक्त बोलल्याशिवाय पोलीस यंत्रणा मिळत नाही.

श्री.भगवान घडमोडे : सामान्य जनतेला टँकर हवे असल्यास प्रथमतः पैसे भरावे लागतात. अधिकारी नगरसेवकांनी सांगीतल्यावरसुध्दा टँकर देत नाही. पोलीस प्रशासनास टँकर फुकट दिले जाते. महानगरपालिकेकडे किती टँकर पाठविले याचा रेकॉर्डच उपलब्ध नाही.

श्री.प्रशांत देसरडा : रूग्णालयात पाणी टाकतांना जागेवर टँकर पकडल. पाणी बाहेर सर्रास विकले जाते. टँकरवर महानगरपालिकेचे नांव लिहावे.

श्री.भगवान घडमोडे : जे खाजगी टँकर लावलेत ते पाण्याचा व्यवसाय करीत आहे. दुसऱ्या ठिकाणी टाकतात.

उपआयुक्त(सिडको) : बँकेच्या लाईटबिला संदर्भात विचारणा केलेली आहे. मालमत्ता विभागाकडुन लाईटबिलाची अदाई होत नाही विद्युत विभागातुन अदाई होते. त्या विभागाकडुन आवश्यक ती माहिती घेऊन पुढील बैठकीत खुलासा करण्यात येईल.

मा.सभापती : मा.आयुक्त या प्रकरणी लक्ष देऊन पुढील बैठकीत माहिती देण्यात येईल.

श्रीमती सफिया मोमीन : वार्ड नं 96 मधे दिनांक 09.09.2008 रोजी विद्युत विभागाकडुन तीन पोल शिफ्टींगकरीता पैसे भरण्यात आले होते अजुनपर्यंत पोल शिफ्ट करण्यात आले नाही.

श्री.प्रशांत देसरडा : प्रत्येक वार्डात प्रत्येक नगरसेवक एमएससीबीचे पोल शिफ्टींग करण्यासाठी पैसे भरतो यामधे करोडो रूपयांचा भ्रष्ट्राचार आहे. एमएससीबी काय कामे करते चेक दिल्यानंतर अधिकारी प्रत्यक्ष जावुन पहाणी केली जात नाही. एमएससीबीला 4 लाख 30 हजाराचा चेक दिला आज रोजी पर्यंत जे तीन पोल शिफ्ट करायचे होते त्यातील दोन पोल शिफ्ट झाले तीसऱ्या पोलसाठी एमएससीबीकडे चकरा माराव्या लागत आहे. पोल शिफ्टींगसाठी एमएससीबीला आजपर्यंत किती पैसे दिले याबाबतची माहिती प्रशासनाकडे नाही. चेक देण्यापर्यंतची कार्यवाही प्रशासन करते परंतु त्यानंतर ते कामे झाले की नाही याकडे पहाणी केली जात नाही.

मा.सभापती : संचिका मिळत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : आत्तापर्यंत इआरपीकडुन उत्पन्न प्राप्त झाले असते. प्रशासनाचे कुढलेच कामे रोखण्यात आलेले नाही. एमएससीबीकडे किती पैसे दिले याबाबतचा अहवाल मागविण्यात यावा.

मा.सभापती : सर्व हिशोब ठेवण्यासाठी Executive Engineer नाही.

श्रीमती सफिया मोमीन : विद्युत विभागामुळे हे सर्व घडत आहे श्री.के.डी.देशमुख यांचेवर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : मा.आयुक्तांना विनंती करणार आहे की, विद्युत विभागासाठी एक Executive Engineer देण्यात यावा. विद्युत विभागाचे कामे हे तीन कार्यकारी अभियंता यांचेकडे वाटुन दिल्यामुळे संचिका मिळत नाही.

श्री.प्रशांत देसरडा :चेक दिल्यानंतर कामे झाले की नाही याबाबतची तपासणी केली जाते का?

श्री.बनकर(उप अभि.विद्युत) : जास्त पैसे भरलेले नाही, एमएससीबीला जे पैसे दिलेले आहे त्या कामांची पहाणी केलेली आहे. याबाबतची माहिती दोन दिवसात सादर करण्यात येईल.

मा.सभापती : पुढील बैठकीत माहिती देण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमीन : वार्ड क्रमांक94 ते 98 या वार्डात पाणी पुरवठ्यासाठी ज्युनिअर इंजिनियरची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : महानगरपालिका कार्यालयात विभागत चांगले काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांना महानगरपालिकेच्या वर्धापनादिना निमीत्त उत्कृष्ठ काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांना उत्तेजनार्थ,वेतनवाढ,प्रात्साहनपर बक्षीस देण्यात यावे. वर्तमानपत्रात,प्रशासनातर्फे वसुलीचे काम चालु आहे, वर्षानुवर्ष रिकामी असलेली दुकाने भाड्याने दिलेली आहे. मालमत्ता करात वाढ झालेली आहे. त्या सर्वांना उत्तेजनार्थ किंवा वेतनवाढ देण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाने याबाबतीत खुलासा करावा.

मा.आयुक्त : वर्धापनानिमीत्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्वांना आमंत्रित केलेले आहे. काम चुकार अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कारवाई केलेली आहे. स.सदस्यांनी उपस्थित केल्याप्रमाणे चांगले काम करणारे अधिकारी/कर्मचारी आहे. या सर्वांना एकाच मापाने मोजने योग्य होणार नाही. खुप चांगले काम करणारे कर्मचारी आहे कामाचे मुल्यमापन बऱ्याच वेळा होत नाही. ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी चांगले योगदान दिले आहे चांगले काम केले आहे. महानगरपालिकेची आर्थीक बाजु उंचावण्यासाठी योगदान दिले आहे. महापालिकेचे नांव उंचावण्यासाठी ज्यांनी ज्यांनी काम केले आहे. वर्ग 1 ते वर्ग 4 पर्यंतच्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे अभिनंदन करुन प्रमाणपत्र देउन गौरविण्यात येणार आहे.

श्री.सतिष कटकटे : सिटी सर्व्हे नंबर 11312 शहाबाजार येथील दर्गाच्या बाजुला नाल्यावर आणि नाल्याच्या मधे अतिक्रमण होत आहे. बांधकामास परवानगी दिलेली आहे की अवैधरित्या बांधकाम चालु आहे. बांधकाम कोणाचे आहे खुलासा करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : गांधीनगर येथे मनपाची शाळा असुन शाळेच्या आवारात महानगरपालिका हॉलचे बांधकाम करीत आहे. एका गृहस्थाने पत्र दिले की, हॉल बांधु शकत नाही प्रशासनाने ते बांधकाम बंद करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या शाळेच्या कंपाउडवॉलच्या बाजुला महानगरपालिकेची तीन एकर जागा आहे.

पत्रे लावुन ठोकुन सदरील जागा विकुन टाकण्यात आलेली आहे. नावावर जागा करून पीआर कार्ड केलेले आहे. शाळेच्या आतमधे अतिक्रमण आहे. परवानगी घेवून जावे लागते.

प्रशासकीय अधिकारी : शाळेच्या कंपाउडवॉलच्या आतमधे अतिक्रमण आहे. गेल्या 25 ते 30 वर्षापासुन तसेच आहे. त्यांनी जे डॉक्युमेंट दिलेले आहे त्याचे व्हेरिफिकेशन केलेले आहे डॉक्युमेंटची तपासणी चालु आहे ते खरे किंवा खोटे त्याची तपासणी झाल्यावर कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती : त्वरीत कारवाई करण्यात यावी.

श्री.सतिष कटकटे : महानगरपालिकेच्या वॉलकंपाउडमधे शाळा आहे हॉलचे बांधकाम वॉलकंपाउडमधे सुरू आहे.

श्री.प्रशांत देसरडा : कंपाउड वॉलच्या मधे शाळेच्या हॉलचे बांधकामास प्रशासनाने स्थगीती दिलेली आहे का? मा.आयुक्तांनी सदरील जागेस भेट देण्यात यावी.

कार्य.अभि.(वार्ड अ,ड) : रविवार बाजार जवळ मनपाची शाळा आहे त्या शाळेच्या आवारात व्यायाम शाळेचा हॉल बांधण्याचे प्रपोजल मंजूर आहे वर्क ऑर्डर झालेली आहे त्याप्रमाणे मनपाच्या जागेत हॉल बांधण्यासाठी मार्कआउटही करण्यात आले होते परंतु त्या जागेच्या बाजुला असलेल्या मालकाने कागदपत्र दिली महानगरपालिकेने 15 ते 20 वर्षापुर्वी 4 हजार स्के.मिटर जागा संपादित केली होती आणि ताब्यात घेतली होती आणि जे कंपाउड वॉल केलेले आहे ते 4 हजार स्के.मिटरपैक्षा जास्त जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतली असा त्यांचा दावा आहे. त्यामुळे ते काम सध्या बंद केले आहे स्थगीत केलेले नाही. संचिका टाउन प्लॅनिंग विभागास पाठवली होती की सदरील जागेचे मोजमाप करून देण्यात यावे. त्या स्थितीत सध्या संचिका आहे.

श्री.प्रशांत देसरडा : महानगरपालिकेला सदरील गृहस्थाने मोजणी करून दिली पाहिजे.

मा.सभापती : तात्काळ मोजणी करून मोजणीमधे मनपाची जागा आढळली तर तात्काळ काम सुरू करण्यात यावे. त्याचे काम असेलतर पाडण्यात यावे. मोजणी करण्याचे आदेश त्यास देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा : कुणीही पत्र देउन काम बंद करण्यात येते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महानगरपालिकेच्या जागेवरील बांधकाम महानगरपालिका बंद का करते.

मा.आयुक्त : काम जे बंद केले ते कुणाच्या आदेशाने बंद केले.

कार्य.अभि.(वार्ड अ,ड) : कुणाचे आदेश घेतले नाही, समस्या तिथे आहे की, जी कंपाउड वॉल केलेले आहे जागा ताब्यात घेतलेली आहे त्याच कंपाउडच्या आतमधे त्या खाजगी माणसाचे घर आहे त्याने ताबा ठेवलेला आहे.कित्येक वर्षापासुन ते तिथे आहे.

मा.आयुक्त : त्याजागेची पहाणी केलेली आहे. त्याच दिवशी आदेश दिले होते की, अतिक्रमण काढण्यात यावे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशाचे पालन का झाले नाही. मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे प्रशासकीय अधिकारी श्री.झनझन यांनी कारवाई करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : समोरचा व्यक्ती न्यायालयात जाउन स्टे आणतो विधी सल्लागार यांनी लक्ष दिले पाहिजे.

मा.सभापती : सिटी सर्व्हे नंबर 11312 मधे बांधकाम परवानगी दिली आहे का? सिटी सर्व्हे नंबर 11312 येथील दर्गाच्या बाजुला असलेले बांधकाम परवानगी असेलतर बांधकाम चालु द्यावे बांधकाम परवानगी नसेल तर तीन दिवसांमधे काढण्यात येउन मा.आयुक्त यांचेकडे अहवाल देण्यात यावा.

श्री.नारायण कुचे : रॅम्केचा कचरा उचलण्याच्या वाहनाने एका व्यक्तीचा मृत्यु झालेला आहे. माहिती देण्यात यावी.

कार्य.अभि.(वार्ड अ,ड) : कचरा उचलण्याचे काम रॅम्के करते आज दुपारी वार्ड ड मधील कचरा भरून कॉम्पॅक्टर त्या ठिकाणी गेले होते. ज्या ठिकाणी कचरा टाकायचा होता त्याठिकाणी थांबले होते थांबुन कचरा अनलोड करण्याचे काम चालु होते. अनलोड करत असतांना त्याच वेळेस एक मुलगा कचऱ्याच्या ठिकाणी आला आणि त्या ढिगाऱ्यावर कचरा वेचयला लागला त्याचवेळी कॉम्पॅक्टर अनलोड झाल्यावर वाईंन्डअप होण्यास सुरवात झाली त्यामधे त्याचा चेहरा दबला गेला आणि तो त्या ठिकाणी मृत्यु पावला आहे.

श्री.सतिष कटकटे : सदरील घटना कितवी आहे.

काय.अभि.(वार्ड अ,ड) : पहीलीच घटना आहे.

श्रीमती सफिया मोमीन : दोन अपघात झालेले आहे.

श्री.सतिष कटकटे : नारेगाव येथील कचरा डेपो आहे त्या ठिकाणी सुप्रिम कोर्टाचे आदेश आहे की, कचरा टाकु नये. खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभि.(वार्ड अ,ड) : उच्च न्यायालयाचे आदेश आहे की, कचरा डेपो तेथुन शिफ्ट करण्यात यावे.

श्री.सतिष कटकटे :आदेशाचे पालन का करण्यात आले नाही.

कार्य.अभि.(वार्ड अ,ड) : जागेचा शोध चालु आहे. जागा मिळत नाही.

श्री.सतिष कटकटे : मनपाचा कचरा जातांना अशी घटना घडलेली नाही. न्यायालयाचे आदेशाचे पालन केले असते व नंतर रॅम्केस काम दिले असतेतर हि घटना घडली नसती. रॅम्केच्या अहवाला बाबत माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : अहवाल आलेला आहे.

श्री.प्रशांत देसरडा : जागेची पहाणी करत असतांना प्रशासनाचा मोठा ताफा असल्यामुळे गावातील लोक विरोध करतात. स्थानिक नेते त्यास विरोध करतात तेव्हा प्रशासनाने परस्पर निर्णय घेउन कचरा टाकतांना वर्तमानपत्राला माहिती द्यावी.

श्रीमती सफिया मोमीन : रॅम्केच्या कर्मचाऱ्यांना स्थानिक भाषा येत नाही स्थानिक लोकांना रॅम्केमुळे रोजगार मिळालेला नाही, रॅम्केचा करार रद्द करण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : वार्डाला रॅम्केच्या कार्याप्रणाली तसेच मजूरांबाबत माहिती दिलेली नाही. किती मजूर रॅम्केला वर्ग केलेले आहे कुठले महानगरपालिकेकडे आहे याबाबतची माहिती नाही.

श्री.प्रशांत देसरडा : माझ्या वार्डात जेसीबी मशीनची आवश्यकता होती तेव्हा माहिती मिळाली की रॅम्केकडे आहे. रजिष्टरवर बघीतल्यास ते रॅम्केकडे नव्हते.

सहायक आयुक्त-2 : रॅम्केकडे घंटागाडीसाठी आणि वाहनावर, घरोघरी कचरा गोळा करण्यासाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील एकुण 413 कर्मचारी देण्यात आलेले आहे. त्यांचे नियंत्रण महानगरपालिकेकडे असले तरी त्यांचा कामाचा पुर्ण पगार रॅम्केकडुन वसुल करणार आहोत.

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | : वर्ग 4 चे कर्मचारी किती मनपाचे आणि सिडको बचत गटाचे कर्मचारी लावले 413 कर्मचारी रॅम्केला दिले. एकुण कर्मचारी किती व इतर कर्मचारी कुठले काम करतात. |
| सहायक आयुक्त-2 | : एकुण 1800 कर्मचारी आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : इतर 1400 कर्मचारी काय कामे करतात. |
| सहायक आयुक्त-2 | : झाडण्याचे आणि गटार काढण्याचे कामे करतात. गटारीतील मलबा कुंडीपर्यंत पोहचविण्याचे काम केले जातात. |
| श्री.सतिष कटकटे | : 400 कर्मचाऱ्यांमधे सदरचा कर्मचारी हा रॅम्केला दिलेला आहे हे सांगू शकतात का? |
| सहायक आयुक्त-2 | : सांगता येईल, नावानिशी यादी दिलेली आहे. |
| श्री.सतिष कटकटे | : रॅम्केचा आणि मनपाचा कर्मचारी ओळखण्यासाठी काही निशानी दिलेली आहे का? |
| सहायक आयुक्त-2 | : कर्मचाऱ्यांची नावानिशी यादी दिलेली आहे आणि प्रत्येक वार्डला यादी दिलेली आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : 1400 जे कर्मचारी आहेत त्यातील कुठल्या कर्मचाऱ्याकडे कुठले काम आहे त्याचा अहवाल देण्यात यावा. |
| श्री.सतिष कटकटे | : कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देण्यात यावी. |
| मा.सभापती | : रॅम्केचा करार रजिष्टर्ड झाला काय खुलासा करण्यात यावा. रॅम्केचा अहवाल आलेला आहे पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल. |
| कार्य.अभियंता(अ,ड) | : रॅम्क्चा जो करार केलेला आहे तो रजिष्टर्ड केलेला नाही. |
| मा.सभापती | : स्थायी समितीने 7 दिवसांमधे करार रजिष्टर्ड करण्याचे आदेश दिले होते. |
| कार्य.अभियंता(अ,ड) | : करार रजिष्टर्ड करण्याचे रॅम्केस कळविण्यात आले होते त्यांनी तसे केले नाही. |
| मा.सभापती | : रॅम्केने करार रजिष्टर्ड केलेला नाही दिलेल्या पत्रास रॅम्केनी प्रतिसाद दिला नाही. |
| श्री.प्रशांत देसरडा | : करार रद्द करण्यात यावा. |
| मा.सभापती | : रॅम्केबाबत पुढील बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येईल. |

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद